महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**पी.आर-३/सबसिडी/** No = 5488 **दिनांक :** 2 MAR 2012

**वाणिज्य परिपत्रक क्र.** १५८

**विषय :-** खरीप हंगाम २०११-१२ मध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आलेल्या गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलात सवलत देण्याबाबत.

**संदर्भ :-**१) शासन निणय क्र. एससीवाय २०११/प्र.क्र. ३२६/भाग १/म-७ दिनांक १८/०१/२०१२.
२) शासनाचे पत्र क्र. संकीर्ण/५५२/ऊर्जा-५ दि. २२/०२/२०१२.

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे शासनाने खरीप हंगाम २०११-१२ करिता राज्यातील ज्या गावांमध्ये खरीप पिकांची सुधारीत हंगामी पैसेवारी ५० पेक्षा कमी जाहीर करण्यात आलेली आहे, अशा गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयात ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलामध्ये ३३ १/३ टक्के इतकी सवलत देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच खरीप हंगामात बाधीत शेतक-यांची वीज जोडणी थकीत बिलासाठी खंडीत करण्यात येऊ नये व फक्त या कारणास्तव खंडीत केली असल्यास तात्काळ पुन्हा जोडण्याची कार्यवाही करावी असेही आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

जिल्हा निहाय सुधारित खरीप हंगामात अंतीम पीक पैसेवारीनुसार ५० पैसे वा त्यापेक्षा कमी असलेल्या गावांची संख्या परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली असुन टंचाईग्रस्त गावांची यादी त्वरीत जिल्हाधिका-यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी.

खरीप हंगाम २०११-१२ या वर्षाकरीता टंचाई परिस्थिती जाहीर झालेल्या गावांची व कृषी ग्राहकांची माहिती संबंधीत माहिती व तंत्रज्ञान विभागास देण्यात यावी.

शासन आदेशाप्रमाणे सदर गावांतील कृषी ग्राहकांना २०११-१२ या वर्षातील त्रैमासिक विज देयके माहे जून ११, सप्टेंबर ११, डिसेंबर २०११ तसेच मार्च २०१२ या वीज बिलामध्ये ३३ १/३ टक्के (म्हणजेच ३३.३३ टक्के) इतकी सवलत देण्यात यावी. सदर अतिरीक्त ३३.३३ टक्के सवलत कृषी ग्राहकांना देण्यात येणा-या शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये देण्यात यावी. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून सदरच्या सवलतीच्या वीज दराची देयके वितरीत करण्यात यावीत.

या अनुषंगाने सर्व संबंधीत क्षेत्रिय अधिका-यांना सुचना देण्यात येत आहेत की, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार टंचाईग्रस्त गावांतील खरीप हंगाम २०११-१२ मध्ये बाधीत कृषी ग्राहकांचा विद्युत पुरवठा वीज देयकाच्या थकीत बिलासाठी खंडीत करण्यात येऊ नये व थकीत बिलाच्या कारणास्तव खंडीत केलेल्या वीज जोडण्या तात्काळ जोडुन देण्याची कार्यवाही करावी.

शासनाच्या सवलतीच्या दराने चालू वीज देयकाचा भरणा न करणा-या कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा नियमानुसार / कायद्यानुसार खंडीत करण्याची कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

२०११-१२ या वर्षातील त्रैमासिक विज देयके माहे   जून ११, सप्टेंबर ११, डिसेंबर २०११ तसेच मार्च २०१२ मध्ये सवलत देण्यामुळे शासनावर पडणा-या आर्थिक बोजाच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावी जेणेकरुन शासनाकडे प्रतिपूर्तीच्या रकमेच्या पुढील कार्यवाहीसाठी  प्रस्ताव पाठविण्यात येईल.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सस्नेह रवाना :-**

मुख्य महाव्यवस्थापक, (माहिती व तंत्रज्ञान), म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

-- आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात खरीप हंगाम २०११-१२ या वर्षात टंचाईग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरात ३३ १/३ टक्के सवलत देण्यात यावी व दिलेल्या सवलतीपोटी वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक बोजाची परिमंडळ व ग्राहक संख्या निहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पूर्तत: करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल. तसेच शासनाकडून अनुदानाची रक्कम प्राप्त झाल्यावर सदर रक्कम कृषी ग्राहकांच्या विज देयकातुन वळती करण्यात यावी.

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**

सन २०११ च्या खरीप हंगामात ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : एससीवाय २०११/प्र.क्र.३२६/भाग-१/म-७

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १८ जानेवारी, २०१२.

पहा :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : एससीवाय २०११/ प्र.क्र.२१९/म-७, दिनांक २८.९.२०११

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : एससीवाय २०११/ प्र.क्र.२१९/म-७ (१), दिनांक ७.१०.२०११

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : एससीवाय २०११/ प्र.क्र.२१९/म-७ (२), दिनांक ७.१०.२०११

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : एससीवाय २०११/ प्र.क्र.२१९/म-७, दिनांक ३ जानेवारी, २०१२.

**प्रस्तावना :**

सन २०११ च्या पावसाळ्यात राज्यातील काही भागात अपूऱ्या पावसामुळे पिण्याच्या पाण्याची व चाऱ्याची कमतरता जाणवत होती. हे लक्षात घेता शासनाने वरील संदर्भ क्र. १ ते ३ येथील शासन निर्णयान्वये (दि.२८ सप्टेंबर, २०११ व दि. ७ ऑक्टोबर, २०११) खरीप पिकांची हंगामी पैसेवारी, ५० पैशांपेक्षा कमी आढळून आलेल्या गावांमध्ये टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर करुन पुढील सवलती जाहीर केल्या:-

i) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आवश्यकतेप्रमाणे कामे सुरु करणे व कोणतीही व्यक्ती रोजगारापासून वंचित राहणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घेणे.

ii) पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या गावांमध्ये टँकर्स, बैलगाड्यां इत्यादी मार्फत पाणी पुरवठा करणे.

iii) मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पामध्ये पिण्यासाठी पाणी अग्रहक्काने राखून ठेवणे.

iv) ज्या गावांतील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी जाहीर करण्यात आली आहे, त्या तालुक्यांतील मंडळस्तरावर जास्तीत जास्त एक चारा डेपो उघडणे.

राज्यामधील सर्व विभागामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी खरीप पिकांची अंतिम पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांनी जाहीर केलेल्या अंतिम पैसेवारीप्रमाणे या ६ विभागात एकूण ६,२०१ गावांमध्ये पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आढळून आली आहे. अशा प्रकारे या विभागांमध्ये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आढळून आलेल्या क्षेत्रामध्ये टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर करणे व त्यानुषंगाने योग्य त्या सवलती देण्याची बाब शासन विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

<u>शासन निर्णय</u> :

राज्यातील सन २०११ च्या खरीप हंगामात जिल्हाधिकारी यांनी ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी घोषित केलेल्या ६२०१ गावांमध्ये (परिशिष्ट- अ) टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात येत आहे.

२. उपरोक्त नमूद केलेल्या गावांमध्ये शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०११ (संदर्भ क्र. १) प्रमाणे देय असलेल्या चार सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. याशिवाय ह्या गावांना खालीलप्रमाणे ६ अतिरिक्त सुविधा नव्याने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

i) जमीन महसूलात सूट.
ii) सहकारी कर्जाचे रुपांतरण.
iii) वीज बीलात ३३ $\frac{1}{3}$% इतकी सूट.
iv) परीक्षा शुल्कात माफी .
v) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती .
vi) बाधित शेतकऱ्यांची वीज जोडणी थकित बिलामुळे खंडीत न करणे व खंडीत केली असल्यास तात्काळ पुन्हा जोडणे.

३. ज्या गावांची नजर पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी होती, मात्र आता अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा जास्त झालेली आहे, तेथे कोणतीही सवलत येथून पुढे लागू होणार नाही.

४. प्रस्तुत आदेशामधील खरीप गावांची अंतिम पैसेवारी ५० पैसे व त्यापेक्षा कमी आलेली आहे त्या गावांचे नावनिशीवार ५० पैसे या त्यापेक्षा कमी पीक पैसेवारी आल्याबाबत सोबतच्या प्रपत्र - ब मधील विहित नमुन्यात जाहीर करावी तसेच या आदेशाला योग्य ती प्रसिद्धी द्यावी.

५. या आदेशान्वये देण्यात येणाऱ्या विविध सवलतीपोटीचा आर्थिक भार संबंधित प्रशासकीय विभागांनी उचलावा व त्यासाठी आवश्यक निधी संबंधित कार्यालयांना उपलब्ध करुन द्यावा.

६. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२०/१२/व्यय-९, दिनांक १८.१.२०१२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रदीप स. इंदुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत :- परिशिष्ट-अ आणि परिशिष्ट-ब

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
कार्यकारी अभियंता (सर्व) जिल्हा परिषद / पाटबंधारे विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पूणे
सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळ, मुंबई
मुख्य अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा / नागरी पाणीपुरवठा
प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणे, पूणे / परभणी / परळी-वैजनाथ / बीड
आयुक्त, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
मुख्य व्यवस्थापक (पतपुरवठा), बँक ऑफ महाराष्ट्र, १५०१, लोकमंगल, शिवाजीनगर, पूणे-५
महाव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक, प्रादेशिक कार्यालय, ५४ वेलस्ली रोड, शिवाजीनगर, पूणे
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, ग्रारोयो / जलसंधारण
सहकार व वस्त्रोद्योग विभाग (सहकार-कार्या-२ स-५ प्रती)
कृषि व पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग (कृषि)
वित्त विभाग (व्यय-९)
पाटबंधारे विभाग (लाक्षेविप्रा)
नियोजन विभाग, रोहयो-६ (५ प्रती)
ऊर्जा विभाग (ऊर्जा-४) (५ प्रती)
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (५ प्रती)
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (पापू-१४) (५ प्रती)
महासंचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
सर्व मंत्रालयीन विभाग,
कार्यासन अधिकारी, म-३ / म-११ / ल-२ / टि-२ / ब-१ / फ-४, महसूल व वन विभाग
महसूल व वन विभागातील इतर सर्व कार्यासने / म-७ कार्यासन (निवडनस्ती)

शासन निर्णय , महसूल व वन विभाग क्र. एससीवाय- २०११ / प्र.क्र.३२६ /भाग-१/म-७,

दिनांक : १८ जानेवारी, २०१२ चे सहपत्र

## परिशिष्ट -अ

### खरीप हंगाम २०११- २०१२ ची अंतिम पैसेवारी जाहीर केलेल्या गावांची संख्या

| अ.क्र | विभाग | जिल्हा | पैसेवारी जाहिर केलेली गावे (खरीप) | ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे | ५० पैशापेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोंकण | ठाणे | १८८४ | ० | १८८४ |
| | | रायगड | १८९१ | ० | १८९१ |
| | | रत्नागिरी | १५१९ | ० | १५१९ |
| | | सिंधुदुर्ग | ७३५ | ० | ७३५ |
| | एकूण | | ६०२९ | ० | ६०२९ |
| २ | नाशिक | नाशिक | १९६० | ५८१ | १३७९ |
| | | धुळे | ६७१ | १४७ | ५२९ |
| | | नंदुरबार | ८७८ | ४ | ८७४ |
| | | जळगांव | १५०१ | ० | १५०१ |
| | | अहमदनगर | ५८० | ४३१ | १४९ |
| | एकूण | | ५५९८ | ११६३ | ४४३२ |
| ३ | औरंगाबाद | औरंगाबाद | ७२८ | ० | ७२८ |
| | | जालना | ५११ | ० | ५११ |
| | | परभणी | ३४५ | ० | ३४५ |
| | | हिंगोली | ६०९ | ० | ६०९ |
| | | नांदेड | १५७५ | ० | १५७५ |
| | | बीड | ७५८ | ० | ७५८ |
| | | लातूर | ९४३ | ३४ | ९०९ |
| | | उस्मानाबाद | ३६२ | ० | ३६२ |
| | एकूण | | ५८३१ | ३४ | ५७९७ |
| ४ | पुणे | पुणे | १३७७ | ० | १३६५ |
| | | सातारा | १५३४ | २७४ | १२२९ |
| | | सांगली | ६३० | ३४० | २९० |
| | | सोलापूर | ० | ० | ० |
| | | कोल्हापूर | १२३३ | ० | १२११ |
| | एकूण | | ४७७४ | ६१४ | ४०९५ |
| ५ | नागपूर | नागपूर | १८२३ | ४९६ | १३२७ |
| | | वर्धा | १३४५ | ० | १३४५ |
| | | भंडारा | ८४७ | ० | ८४७ |
| | | गोंदिया | ९२३ | ५० | ८७३ |
| | | चंद्रपूर | १३९७ | ० | १३९७ |
| | | गडचिरोली | १४६४ | ११२६ | ३४८ |
| | एकूण | | ७७९९ | १६६२ | ६१३७ |
| ६ | अमरावती | अमरावती | १९८५ | १९८१ | ० |
| | | अकोला | १००९ | ० | ९९७ |
| | | यवतमाळ | २१४५ | ० | २०४५ |
| | | बुलढाणा | १४१९ | ७४७ | ६७२ |
| | | वाशिम | ७९३ | ० | ७९३ |
| | एकूण | | ७३५१ | २७२८ | ४५०७ |
| | एकुणात एकूण | | ३७३८२ | ६२०१ | २६४१० |

शासन निर्णय , महसूल व वन विभाग क्र. एससीवाय- २०११ / प्र.क्र.३२६ /भाग-१/म-७,
दिनांक : १८ जानेवारी, २०१२ चे सहपत्र

## परिशिष्ट "ब"

ज्या अर्थी, शासन निर्णय क्रमांक.एससीवाय- २०११/ प्र.क्र.३२६/भाग-१/म-७, दिनांक १८ जानेवारी, २०१२ नुसार सन २०११-२०१२ च्या खरीप हंगामातील ज्या गावांची अंतिम पैसेवारी ५० पैसे या त्यापेक्षा कमी आलेली आहे ती गांवे टंचाईग्रस्त म्हणून जाहीर करावयाची आहेत.

त्या अर्थी, त्या अनुषंगाने मी ---------------------------, जिल्हाधिकारी, --------------- जिल्हा खाली नमूद केलेल्या तालुक्यामधील त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या गावांत टंचाई परिस्थिती जाहीर करीत आहे:-

| अ.क्र. | तालुका | खरीप पिकांची अंतिम पैसेवारी ५० पैसे या त्यापेक्षा कमी आलेल्या गावांची नांवे व संख्या |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

सही/-
जिल्हाधिकारी, जिल्हा.

--------